IJERST

# International Journal of Engineering Research and Science & Technology

www.ijerst.org

ISSN : 2319-5991



Vol. 22 No. 1(s) (2026)

ijerst.editor@gmail.com

editor@ijerst.com

IJERST International Journal of Engineering Research and Science & Technology
www.ijerst.com
© 2026 IJERST. All Rights Reserved
Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Research Paper

# मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

१. प्रा. पोकळे मीना देवराव
१. प्रा. राणी शिवाजी सावंत
मराठी विभाग
जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.
मो. नं. : ९४२३७६६३३४
E- Mail : meenakachare34@gmail.com

**सारांश :**

मराठी साहित्याचा कृत्रिम बुद्धिमत्तेशी सहसंबंध सांगता येतो. सध्याच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता ही माहिती तंत्रज्ञानातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणून उदयास आली आहे. विविध भाषांप्रमाणेच मराठी भाषा आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रातही एआयमुळे नवीन शक्यता आणि संधी निर्माण होत आहेत. नैसर्गिक भाषा प्रक्रिया, मशीन ट्रान्सलेशन, टेक्स्ट विश्लेषण आणि डिजिटल संग्रह यांसारख्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मराठी साहित्याचे संग्रहीकरण, वर्गीकरण आणि अभ्यास अधिक सुलभ कसा होऊ शकतो याचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच एआयच्या माध्यमातून साहित्यिक ग्रंथांचे भाषिक विश्लेषण, लेखकशैलीचा अभ्यास, स्वयंचलित अनुवाद आणि नवीन साहित्यनिर्मिती या बाबींचाही आढावा घेता येतो. यामुळे संशोधक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी यांना मराठी साहित्य अधिक सुलभ आणि व्यापक स्वरूपात उपलब्ध होण्यास मदत होते. तथापि, एआयच्या वापरामुळे भाषेची अचूकता, सांस्कृतिक संदर्भ आणि सर्जनशीलतेशी संबंधित काही आव्हानेही निर्माण होतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी विचार, मूल्ये आणि साहित्यिक संवेदनशीलता यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य यांचा संगम भविष्यात संशोधन आणि साहित्यनिर्मितीच्या नव्या दिशांना मार्गदर्शक ठरू शकतो.

**बीज शब्द :** मराठी साहित्य, कृत्रिम बुद्धिमत्ता, आव्हाने, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, मशीन अनुवाद, डिजिटल साहित्य, टेक्स्ट विश्लेषण, साहित्य संशोधन.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याला प्राचीन अशी समृद्ध परंपरा आहे. खऱ्या अर्थाने मराठी साहित्याची सुरुवात संत साहित्यापासून झाली आहे. संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत एकनाथ यांचे अभंग आपल्याला मराठी साहित्यात पहावयास मिळते. मराठी साहित्य हे महाराष्ट्र सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा एक भाग असून यामध्ये कथा काव्य नाटक लघुकथा कादंबरी यांचा समावेश होतो. आजच्या डिजिटल युगात

तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर प्रभाव टाकला आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता या आधुनिक तंत्रज्ञानामुळे लेखन, भाषांतर, आणि साहित्य यामध्ये नवीन बदल घडत आहेत. मराठी साहित्याच्या क्षेत्रातही AI चा वापर वाढत असून तो साहित्य निर्मितीसाठी आणि अभ्यासासाठी महत्त्वाचे साधन बनत आहे. 21 व्या शतकात तंत्रज्ञानाच्या प्रगतीने AI ने साहित्य क्षेत्रात एक नवीन क्रांती घडवून आणली आहे मराठी साहित्य आणि AI यांच्यातील उपयोग, फायदे यांचा अभ्यास करण्यात येतो.

**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? :**

आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमात्तेला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार करण्याची, शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. AI च्या मदतीने संगणक भाषा समजून घेऊ शकतो, मजकूर लिहू शकतो, भाषांतर करू शकतो आणि माहितीचे विश्लेषण करू शकतो. उदा. स्वयंचलित भाषांतर, मजकूर निर्मिती, भाषेचे विश्लेषण, आवाज ओळख प्रणाली इ.

**मराठी साहित्याची पार्श्वभूमी :**

मराठी साहित्याला सुमारे हजार वर्षांची समृद्ध परंपरा आहे. संत साहित्य, भक्ती चळवळ, आधुनिक कविता, कथा, कादंबरी आणि नाटक अशा विविध प्रकारांमध्ये मराठी साहित्य हे विकसित झाले आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, बहिणाबाई, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर यांसारख्या लेखक साहित्यात आहे. आज डिजिटल माध्यमामुळे मराठी साहित्य हे अतिशय वेगाने लोकांपर्यंत पोहोचत आहे.

**मराठी साहित्यामध्ये कृत्रिम बुद्धिमात्तेचा वापर :**

लेखन आणि संपादन : कृत्रिम बुद्धिमात्तेच्या मदतीने लेखकांना लेखन करताना कल्पना सुचवणे, व्याकरणांमध्ये दुरुस्ती करणे आणि मजकुरामध्ये सुधारणा करणे सोपे झाले आहे.

भाषांतर : भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत रूपांतरीत करणे. जगभरातील माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी भाषांतर खूप महत्त्वाचे आहे. याबरोबरच कृत्रिम बुद्धिमात्तेच्या मदतीने मराठी ते इंग्रजी किंवा इतर भाषांमध्ये भाषांतर करणे अधिकच सोपे झाले आहे. त्यामुळे मराठी साहित्य जागतिक स्तरावर पोहोचण्याची शक्यता वाढली आहे.

संशोधन आणि विश्लेषण : तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन आणि विश्लेषणाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर साहित्यिक मजकूराचे विश्लेषण करणे शक्य झाले आहे. त्यामुळे संशोधन हे जलद, अचूक आणि प्रभावशाली बनले आहे. संशोधक हा नमुना गोळा करणे, मोठ्या डेटाचे विश्लेषण, निष्कर्ष काढणे आणि नव्या कल्पना सुचवण्यासाठी AI चा वापर करतात उदा. एखाद्या लेखकाच्या लेखनशैलीचा अभ्यास करणे, साहित्यिक प्रवाहांचे विश्लेषण करणे, शब्दसंपत्तीचा अभ्यास करणे इ.

डिजिटल संग्रह :

कृत्रिम बुद्धिमात्तेचा वापर डिजिटल संग्रह व्यवस्थापनात जलद शोध घेणे वर्गीकरण करणे, विश्लेषण करणे आणि संरक्षण यासाठी केला जातो. तसेच त्याच्या मदतीने जुनी पुस्तके, हस्तलिखिते आणि दस्तऐवज

डिजिटल स्वरूपात जतन करता येतात. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांना साहित्य हे मोठ्या प्रमाणात सहज उपलब्ध होऊ शकते.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे :**

मराठी साहित्य क्षेत्रात आज कृत्रिम बुद्धिमात्तेचे फार मोठ्या प्रमाणात फायदे होत आहेत. लेखन प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ होते आहे. संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर माहितीचे विश्लेषण करता येते. भाषांतरामुळे मराठी साहित्य हे जगभर पोहोचत आहे. शुद्धलेखन आणि अचूक शब्द रचनेस मदत करणे, डिजिटल जतनामुळे जुने साहित्य सुरक्षित राहते, कल्पना सुचवणे, कथानकाची रचना तयार करणे, संदर्भ, वाक्यरचना किंवा भाषाशैली सुधारण्यात मदत करणे. संवाद किंवा कविता लिहिण्यात मार्गदर्शन याच्या सहाय्याने लेखक लघुकथा, कविता किंवा नाट्यसाहित्य अधिक चांगले आणि जलद गतीने तयार करू शकतो.

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मर्यादा आणि आव्हाने :** कृत्रिम बुद्धिमत्तेचे काही फायदे असले तरी काही मर्यादा देखील आहेत. त्यामध्ये मानवी भावना आणि सर्जनशीलता नसते. कधीकधी माहिती अचूक असेलच असे सांगता येत नाही. लेखकांच्या मूळ कल्पनांचे संरक्षण होणेही महत्त्वाचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवरपूर्णपणे अवलंबून न राहता मानवाने आपल्या नैसर्गिक क्षमतेचा वापर करणे आवश्यक आहे. त्यातूनच मानवी सर्जनशीलतेला अधिक वाव मिळू शकेल.

**भविष्यातील शक्यता :** आजच्या डिजिटल युगात प्रत्येक क्षेत्रात आपले वर्चस्व दाखवत आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मराठी साहित्य अधिक आधुनिक आणि जागतिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मराठी भाषेसाठी अधिक प्रगत साधने विकसित होऊ शकतात. डिजिटल पुस्तकालये मोठ्या प्रमाणात वाढून ज्ञान समृद्धीसाठी त्याची मदत होईल. नवीन प्रकारचे साहित्य निर्माण होईल, मात्र मानवी कल्पनाशक्ती, अनुभव आणि भावना हे साहित्याचे मूळ घटक असल्यामुळे कृत्रिम बुद्धिमाता हे फक्त सहाय्यक साधन म्हणूनच उपयोगी ठरेल.

**निष्कर्ष :** मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संबंध आधुनिक काळात अधिक दृढ होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संशोधन, भाषांतर, लेखन आणि साहित्य जतन करण्याच्या प्रक्रियेत मोठी मदत होते. तसेच साहित्याच्या निर्मितीत मानवी भावना, अनुभव आणि सर्जनशीलता यांचे महत्त्व कायम राहणार आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता हे साहित्य निर्मितीचे पर्याय नसून एक सहाय्यक साधन आहे. योग्य वापर केल्यास ते मराठी साहित्याच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**समारोप :**

मराठी साहित्य हे आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. यामध्ये अनेक कालखंडांचे साहित्य, काव्य, कथा, नाटके, कादंबरी यांचा समावेश होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरणांचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात ग्रंथांचे विश्लेषण, शैली आणि भाषिक नमुन्यांचा अभ्यास, तसेच लेखकांचे व्यक्तिमत्व ओळखणे यासारखी कामे आता शक्य झाली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने, मराठी साहित्य संशोधन हे अधिक सखोल आणि विस्तृत झाले आहे. साहित्य संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्याने केवळ पारंपारिक संशोधन पद्धतींचे आव्हान कमी झाले नाही, तर नवीन संशोधनाच्या संधी देखील उपलब्ध झाल्या आहेत.

म्हणूनच मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संगम केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा नाही, तर तो भविष्यातील अभ्यासासाठी आणि साहित्यासाठी नवे पर्यायही ठरू शकतो. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ तंत्रज्ञान आहे. खऱ्या अर्थाने साहित्याचा आत्मा संवेदनांमध्ये आणि मानवी भाव-भावना मध्ये आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानव यांचा समन्वय साहित्य सृष्टीसाठी अनमोल ठरेल.

**संदर्भसूची :**

१. डॉ. सांगळे संदीप, मराठी वाड्मय तंत्र आणि आस्वाद समीक्षा, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००९ प्रथमावृत्ती

२. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०१५

३. संपा. स्टॅमाटिओस पापाडाकिस आणि अलेक्झांड्रोस कपानायरिस, लोकपरंपरा आणि त्याचे डिजिटल मानविकी संदर्भातील विश्लेषण, इन्फोर्मेशन सायन्स रेफरन्स,२०२२

४. डॉ. उपाध्ये बाबुराव, संतसाहित्य : स्वरूप आणि शोध राज माइंड पावर पब्लिकेशन, श्रीरामपूर,प्रथमावृत्ती फेब्रुवारी २०२०